RNI- MAHMAR2003/14666
L/130/RNP/Renewal/2021-23
SHIV VANI
सडेतोड आणि परखड विचारांची सत्यवाणी
# शिव वाणी
■ बीड ■ साप्ताहिक ■ मराठी ■ वर्ष २१ वे ■ अंक ५१ ■ सोमवार दि.२३ डिसेंबर २०२४ Mo.9422748792/ 9822628521 पाने : ४ किंमत ०३ ₹
Beed (Maharashtra) Weekly MARATHI Year-21 Issue -51 MONDAY DT.23 DECEMBER 2024 RNI- MAHMAR2003/14666 PAGES - 4 PRICE - 3 RUPEES

## आता एक गुंठ्याची देखील खरेदी–विक्री करता येणार,नागपुर हिवाळी अधिवेशनात महत्त्वपुर्ण निर्णय

केज ।प्रतिनिधी

नागपुर येथील नुकत्याच झालेल्या हिवाळी अधिवेशनात जमिनी संदर्भात एक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आलेला आहे.नागपूर हिवाळी अधिवेशनात विधानसभा आणि विधान परिषदेमध्ये राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडून तुकडेबंदी कायद्यातील सुधारणा संदर्भात एक महत्त्वपूर्ण विधेयक सादर करण्यात आले.विधानसभा आणि विधान परिषद या दोन्ही ठिकाणी एकमताने हा महत्त्वपूर्ण विधेयक मंजूर करण्यात आलेला आहे. मंजूर करण्यात आलेल्या या विधेयकामुळे एक गुंठा दोन गुंठे,तीन गुंठे,चारगुंठे अशी जमीन खरेदी व विक्री करण्याचा मार्ग मोकळा झालेला आहे.विहीर,शेतरस्ता,घर बांधकाम इत्यादीसाठी याचा फायदा होणार आहे तुकडेबंदी कायदा १९४७ च्या विधेयका मध्ये करण्यात आलेला या बदलामुळे एखाद्या सर्व सामान्य नागरिकाला किंवा शेतकऱ्यांना शेतात घर बांधणे किंवा शेतात जाण्यासाठी रस्ता खरेदी करणे तसेच विहीर खोदकामासाठी एक गुंठा किंवा दोन गुंठे जमीन खरेदी करणेसहजासहजी एकदम सोपे होणार आहे.

# अमित शाहांविरोधात काँग्रेसचा एल्गार

## राजीनाम्यासाठी २६ जानेवारीपर्यंत देशव्यापी आंदोलनाची घोषणा, बेळगावात भव्य रॅली

नवी दिल्ली : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी काँग्रेस पक्ष पुढील वर्षी २६ जानेवारीपर्यंत देशभर प्रचार मोहीम राबवणार आहे. २२ आणि २३ डिसेंबर रोजी काँग्रेस नेते १५० हून अधिक शहरांमध्ये पत्रकार परिषद घेणार आहेत. २४ मार्च रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढणार आहे. २७ डिसेंबर रोजी कर्नाटकातील बेळगावात मोठी रॅली होणार आहे. काँग्रेसचे सरचिटणीस केसी वेणुगोपाल यांनी रविवारी सांगितले की, संसदेच्या अधिवेशनात राज्यघटनेवर झालेल्या चर्चेदरम्यान अमित शाह यांनी आपल्या भाषणात बाबासाहेबांचा अपमान केला आहे. शहा यांच्या वक्तव्यामुळे सर्वजण दुखावले आहेत. आजपर्यंत अमित शहा किंवा पंतप्रधानांनी माफी मागितलेली नाही. काँग्रेस हा मुद्दा प्रजासत्ताक दिनापर्यंत म्हणजेच २६ नेवारीपर्यंत देशभरात मांडणार आहे.

काँग्रेस नेते पवन खेडा यांनीही माहिती दिली होती की लोकसभा आणि राज्यसभेतील काँग्रेस खासदार आणि उथउ सदस्य देशभरातील १५० वेगवेगळ्या शहरांमध्ये



पत्रकार परिषद घेऊन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या राजीनाम्याची मागणी करतील.


### भाजपनेही तयारी सुरू केली

काँग्रेसची रणनीती पाहून भाजपनेही विरोधकांना उत्तर देण्याची तयारी सुरू केली आहे. पक्षाने आपल्या एससी/एसटी आघाडीला विधानसभेच्या सर्व जागांवर काउंटर मोहीम आखण्यास सांगितले आहे. यूपी भाजप एससी/एसटी मोर्चाचे अध्यक्ष रामचंद्र कन्नौजिया यांनी पुष्टी केली की पक्ष तळागाळातील विरोधकांचा पर्दाफाश करण्यासाठी मोहीम सुरू करेल. ते म्हणाले, पक्ष दलितविरोधी घोषणा आणि विरोधी पक्षांच्या आधीच्या सरकारांनी उचललेली पावले अधोरेखित करेल. या महिन्याच्या अखेरीस होणाऱ्या संघटनात्मक निवडणुकांनंतर लगेचच या प्रचाराला सुरुवात होईल, असे ते म्हणाले. ते म्हणाले की, मोर्चाच्या जिल्हा घटकांना दलितबहुल गावांमध्ये जाऊन भाजप सरकारने गेल्या १० वर्षात सुरू केलेल्या योजना लोकांपर्यंत पोहोचवण्यास सांगण्यात आले आहे.

## निराधारांना मिळणार संजय गांधी, श्रावणबाळ योजनेचा लाभ

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील अनेक निराधारांना संजय गांधी, श्रावणबाळ योजनेच्या माध्यमातून आधार मिळणार आहे. गेल्या अनेक दिवसांपासून या योजनांच्या रखडलेल्या मंजुरी अखेर झाल्या असून नवीन लाभार्थ्यांची यादी तयार झाली. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासकीय स्तरावर अनेकवेळा पाठपुरावा केला होता. त्याला आता यश आले आहे.



निराधार वयोवृद्ध नागरिक यांना निर्वाहासाठी निधी देणारी श्रावणबाळ योजना तसेच निराधार व्यक्ती, अंध, अपंग, अनाथ मुले, दिर्घ आजार, घटस्फोटीत स्त्रिया इत्यादी दुर्बल घटकांना आर्थिक मदत पुरवणारी संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि अशाप्रकारच्या इतर योजनांच्या समितीची गेल्या अनेक दिवसांपासून बैठक झाली नव्हती, त्यामुळे गोरगरीब आणि गरजू या योजनांच्या लाभापासून वंचित होते. बर्याच दिवसांपासून प्रस्ताव आणि अर्ज दाखल करून देखील लोकांना लाभासाठी प्रतिक्षा करावी लागत होती. याबाबत आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासकीय स्तरावर अनेकवेळा पाठपुरावा करून, बैठका घेऊन संबंधित यंत्रणा व योजना समितीच्या बैठका घेऊन नवीन पात्र लाभार्थी यादीत समाविष्ट करून पात्र आणि गरजूंना लाभ देण्यासाठी निर्देशीत केले होते. यावर आता श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजनेंतर्गत बीड तालुक्यातील ग्रामीण भागातून असलेल्या १२९ व शहरातील ९७ नवीन लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. यासोबतच संजय गांधी निराधार पेन्शन योजनेंतर्गत शहरातील ७६ व ग्रामीण भागातील ११२ पात्र आणि गरजू लाभार्थ्यांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. तहसिलदार यांच्या नेतृत्वाखाली सदरील योजनांची बैठक होऊन नवीन लाभार्थींचा योजनेच्या यादीत सामावेश केला गेला आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून वंचित असलेल्या गोरगरीब, निराधार, दुर्बल घटकांना आ.संदीप क्षीरसागरांच्या माध्यमातून मोठा दिलासा मिळाला आहे. दरम्यान ज्या लाभार्थ्यांचे अर्ज त्रुटीत पडले आहेत, त्यांनी लवकरात लवकर त्रुटीपूर्तता करावी असे आवाहनही आ.संदीप क्षीरसागर यांनी केले आहे.



## बीड जिल्हा वकील क्रिकेट संघाच्या उद्घाटन व टी–शर्टचे अनावरण

बीड ।प्रतिनिधी

संभाजीनगर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय वकिलांच्या क्रिकेट स्पर्धेसाठी बीड जिल्हा क्रिकेट वकील संघास शुभेच्छा व प्रयोजक कलीम जहांगीर तर्फे क्रिकेट टी–शर्टच अनावरण करताना, बीड जिल्हाचे प्रमूख व सत्र न्यायाधीश मा.आनंद यावलकर साहेब, बीड जिल्हा वकील संघांचे अध्यक्ष अ‍ॅड. रोहिदास येवले, सचिव अ‍ॅड. यासेर पटेल, क्रिकेट कोच अ‍ॅड. राजन साळवी, उपाध्यक्ष अ‍ॅड. नितीन वाघमारे, उपाध्यक्ष अ‍ॅड. अविनाश गडगे, सहसचिव अ‍ॅड. श्रीकांत जाधव, अ‍ॅड. प्रशांत देशपांडे, महिला प्रतिनिधी अ‍ॅड. छाया वाघमारे, कोच आझर सर, कोच संजय धस, अ‍ॅड. प्रशांत जाधव, बीड जिल्हा वकील क्रिकेट संघांचे कर्णधार अ‍ॅड. साजेद सय्यद, उपकर्णधार अ‍ॅड. राहुल वाडमारे, अ‍ॅड. रंजीत वाघमारे, अ‍ॅड. सुशीम वाडमारे, अ‍ॅड. फिरोज पठाण, अ‍ॅड. सचिन काळकुटे, अ‍ॅड. शैलेश जाधव, अ‍ॅड. सिद्धार्थ उजगरे, अ‍ॅड. बाळासाहेब मगर, अ‍ॅड. आगे, अ‍ॅड. पोपळे, तसेच बीड जिल्हा वकील संघ क्रिकेट टीमचे सदस्य तसेच वकील महिला क्रिकेट संघाचे सदस्य उपस्थित होते







# संपादकीय

## आम्हाला तुमची लाज वाटते!

हिवाळी अधिवेशनाचा शुक्रवारी समारोप झाला, पण शेवटच्या दिवशीही भरीव कामकाज झाले नाही. लोकसभा वीस दिवस, तर राज्यसभा १९ दिवस चालली. दोन्ही सभागृहांमध्ये काही वेळा कमी वेळात प्रचंड कामकाज उरकल्याची आकडेवारी समोर येते आहे.

नव्या संसद भवनाच्या मकरद्वारासमोर गुरुवारी सर्वपक्षीय खासदारांनी जो तमाशा केला; तो अभूतपूर्व होता. आजवर संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये कागद फाडणे, भिरकावणे, परस्परांच्या अंगावर धावून जाणे... असे प्रकार घडत. कामकाज बंद पाडणे, यात तर काहीच नवीन नाही आणि त्याबद्दल कुणी एकमेकांना दोषही देऊ नये. सगळे एकाच माळेचे मणी आहेत. मात्र, गुरुवारी ज्या पद्धतीने दोन खासदार जखमी झाले आणि त्यांना रुग्णालयात न्यावे लागले; ते पाहता ही मंडळी संसदेत एक दिवस एकमेकांच्या उरावर बसून जीव घेतील.

हिवाळी अधिवेशनाचा शुक्रवारी समारोप झाला, पण शेवटच्या दिवशीही भरीव कामकाज झाले नाही. लोकसभा वीस दिवस, तर राज्यसभा १९ दिवस चालली. दोन्ही सभागृहांमध्ये काही वेळा कमी वेळात प्रचंड कामकाज उरकल्याची आकडेवारी समोर येते आहे. मात्र, संपूर्ण अधिवेशनाचा हिशेब मांडला तर ठरलेल्या कामकाजातील कधी दोन टक्के तर कधी चार टक्के कामकाज झाले आहे. लोकसभेत एकही तहकुबी सूचना किंवा सदस्यांची खासगी विधेयके चर्चेस घेता आली नाहीत. राज्यघटनेवरील चर्चा तेवढी झाली. तिला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अत्यंत विस्तृत, पण अनावश्यक आक्रमक उत्तरही दिले. मात्र, या राज्यघटनेची आपण किती बूज राखतो; याचे रक्तरंजित प्रात्यक्षिक दोन्हीकडच्या खासदारांनी गुरुवारी देशाला घडविले. इतके बेशरम लोकप्रतिनिधी आपण निवडून दिले, याचा शहाण्यासुरत्या मतदारांना नक्कीच विषाद वाटला असेल.

या प्रकरणात चूक कुणाची, हा प्रश्नच दुय्यम मानायला हवा. ासदार खाली पडतात, त्यांच्या डोक्याला खोका पडतात आणि रक्त वाहते, हा काय प्रकार आहे? नंतरच्या दोन्हीकडच्या पत्रकार परिषदा या परस्परांवर आरोप करणाऱ्या, ठपका ठेवणाऱ्या आणि उणीदुणी काढणाऱ्या होत्या. मात्र, भारतीय जनता पक्ष किंवा काँग्रेस या दोन्ही पक्षांच्या सर्वोच्च नेत्यांना 'जे झाले, त्याबद्दल आम्ही देशाची बिनशर्त क्षमा मागतो. लोकशाहीच्या मंदिराच्या प्रांगणात असे व्हायला नको होते...' असे म्हणावेसे वाटले नाही.

किती हा मस्तवालपणा! भाजपचे उडिशातील खासदार आणि माजी केंद्रीय मंत्री प्रताप सारंगी हे खाली पडून त्यांच्या कपाळातून रक्त वाहू लागले; तेव्हा विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे त्यांच्या जवळ गेले. मात्र, त्यांनी तेथे खाली बसून सारंगी यांची चौकशी केल्याचे, त्यांना आपुलकीने हात दिल्याचे चित्रीकरणात तरी दिसत नाही. राहुल यांनी एका खासदाराला दिलेला जोरदार धक्का सारंगी यांना बसून ते खाली पडले का, हे चौकशीत स्पष्ट व्हावे. या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज सर्वांसाठी संपादित न करता खुले करावे, ही मागणी योग्य आहे. निदर्शने करताना भाजप खासदारांनीही चिथावणीखोर वक्तव्ये केली असतील आणि राहुल व इतरांची वाट रोखली असेल तर तेही सगळ्यांना कळावे. दोन्ही गुडघ्यांवर शस्त्रक्रिया झालेले वयोवृद्ध काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांना धक्काबुक्की चुकविण्यासाठी बसकण मारावी लागली असेल तर या इतकी लाजिरवाणी बाब नाही.

# ती नजर कधी पोलीस स्टेशनला पोहोचेल :- न्या जैन मॅडम

## आयुष्य इतक सुंदर आहे त्याला सुंदरतेप्रमाणे जगायला शिकायला पाहिजे

अंबड(प्रतिनीधी)

जालना जिल्ह्यात होत असलेल्या महिलां मुलींवर होणारे अन्याय अत्याचार विरोधात विधी सेवा प्राधिकरण व वकील संघ अंबड यांच्या संयुक्त विद्यामानाने अंबड शहरातील मत्स्योदरी महाविद्यालय येथे कायदेविषयक शिबिर घेण्यात आले शिबिरामध्ये विद्यार्थी विद्यार्थिनींना कायदेविषयक माहिती देण्यात आली त्यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना पोउपनि पूजा कदम यांनी सांगितले की जिल्ह्यात होणारे अन्याय अत्याचार विरोधात पथक नियुक्त करण्यात आले आहे त्यामध्ये विद्यार्थ्यांनी मोबाईलचा उपयोग फक्त अभ्यासापुरता करावा इतर गोष्टीचा उपयोग करू नये जेणेकरून त्याचा दुरुपयोग होऊन आपण दुसऱ्यांच्या बळी पडू शकतो अशामुळे आपण आपले फेसबुक आणि इतर प्रायव्हेट आयडी यांना देखील लॉक करू शकतो त्यामुळे आपले दुसरे अकाउंट कोणी ओपन करू शकत नाही . आपण आपल्या मैत्रिणी शिवाय इतर दुसऱ्याला कोणालाही फ्रेंड रिक्वेस्ट कधीही पाठवू नये अशावेळी आपले फेसबुक अकाउंट व इतर अकाउंट फेक अकाउंट तयार होऊन आपल्याला ब्लॅकमेल व इतरांना पैशाची मागणी देखील त्याद्वारे करण्यात येईल यापासून आपण सर्वांनी सावध राहायचे भरोसा सेल जालना जिल्ह्यात होणारे महिला मुलींवर अत्याचार थांबवण्याचे काम करत असते. महाविद्यालयामध्ये ग्रामीण भागातून सर्वाधिक विद्यार्थिनी शहरी भागात बस द्वारे प्रवास करत असतात त्यात त्यांना देखील त्याचा खूप त्रास सहन करावा लागत असतो जर मुलींची कोणी छेड काढली तर याद राखा असेही दामिनी पथकाचे प्रमुख यांनी सांगितले की जिल्ह्यात होणारे महिला मुलींवर छेडछाड थांबवण्याचे काम आम्ही करत असतो तुम्ही आमच्याशी केव्हाही संपर्क साधू शकता आपल्या सेवेसाठी पोलीस प्रशासन तत्पर्य सेवेत आहे असे पोउपनि पूजा कदम मॅडम यांनी सांगितले. अंबड पोलीस ठाण्याचे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक सतीश जाधव सरांनी देखील मुला मुलींना मुलाचे मार्गदर्शन केले त्या ते म्हणाले की मुलगी लहान असो की मोठी असो ही आपले वडिलांचे मुलींचे लग्न करून द्यायचे ही एक जिम्मेदारी असते आणि मुलींनी आपल्या आई-वडिलांचे नावलौकिक करण्यासाठी कष्टाने अभ्यास करून अधिकारी झाले पाहिजे जेणेकरून आपले व आपल्या आई वडिलांचे नाव उंचावले जाईल असे देखील त्यांच्या मानसन्मान होईल तुम्हाला कोणी विनाकारण त्रास देत असेल आणि ते त्रास तुम्ही सहन करत असेल तर हे चुकीचे आहे तुम्ही आपल्या महाविद्यालयामध्ये ठेवण्यात आलेल्या तक्रारीमध्ये तुम्ही तक्रार पेटीत तक्रार करू शकता त्यावर तात्काळ कारवाई केली जाईल असेही ते म्हणाले आणि आपण शिकून प्रगतशील व्हा आपण व आपले नाव तसेच महाविद्यालयाचे लौकिक करा त्यात तुमचे यश निश्चित होईल असे जाधव साहेब म्हणाले. महाविद्यालयात विद्यार्थी व विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना न्यायाधीश श्रीमती जैन मॅडम म्हणाले की शासनाला २०१२ साली कायदाकरायची काय गरज पडली इत्यादी भारतीय दंडविधान कायदा होता बालकांसाठी वेगळा कायदा करायची काय गरज पडली काहीतरी घटना घडली म्हणून का येथे बसलेले पीआय असेल किंवा दामिनी पथक असेल यांच्यासमोर अशा अनेक केसेस आले असतील शेकडो केस देखील आमच्याकडे आलेले असते त्यामध्ये आम्ही साक्षीदारांची जबाब नोंदवण्याची काम करत असताना असे भयानक चित्र आमच्यासमोर येतात एवढे आवरलेस करून देखील हे कुठेतरी थांबायला पाहिजे असं वाटत नाही का काही गोष्टी आपल्या हितामध्ये नसतात. आपल्या मुलांनी कुठेतरी शिकून सौरुन तो आपल्या पायावर उभा राहून कोणावर अवलंबून राहणार नाही. मुलांना कळंतन कळत काहीतरी घटना घडत असते. जर एखाद्या व्यक्तीने दुसऱ्या व्यक्तीकडे नजर रोखून पाहिले तर तो एक गुन्हा देखील होऊ शकतो. मुलाने मुलीकडे पहात राहिले तर तो देखील एक गुन्हा होऊ शकतो तर ती नजर कधी पोलीस स्टेशनला नेऊन पोहोचेल हे सांगता येणार नाही अशा अनेक भानगडी पडायचे तरी कशाला विद्यार्थ्यांनी स्वतःला कुठेतरी लिमिट हालायला पाहिजे. आपण रोज सकाळी झोपेतून उठलो की पहिले हातात मोबाईल घेऊन आपल्या मोबाईलवर कुणाचे एसएमएस आले आहे का हे पाहत असतो जर आपण एखाद्या वेळी मोबाईल जर नाही पाहिलं तर काही फरक पडत नाही आपण कधी असा विचार केला आहे का? की आज आपला कोणता क्लास आहे का आपण त्याचा होमवर्क केला आहे का नाही कळत न कळत अमिषाला बळी पडतो काही वेगळ्या गोष्टींकडे आकर्षित होतो. आपण १६ ते १८ वयाच्या आत आपण बालक असतो यामध्ये आपल्याला काही समजदेखील आहेत प्रत्येक गोष्टीची जाणीव देखील असते. आयुष्य इतक सुंदर आहे त्याला सुंदरतेप्रमाणे जगायला शिकायला पाहिजे तुमच्यामध्ये भौगोलिक क्षमता कमी असले तरी चालेल पण भावनिक क्षमता असायला पाहिजे आपण जर एखाद्या गोष्टीकडे आकर्षित होत असेल तर किंवा एखाद्या व्यक्तीच्या प्रेमात पडत आहेत हे मला आधी कळायला पाहिजे जर आपण स्वतःचे इमोशनल समजू शकले नाहीत तर दुसऱ्यांचे भावना काय समजू शकाल आपल्या डोळ्यासमोर जर काही चुकीचे होत असेल तर त्याला तिथेच थांबवण्याचे काम केले पाहिजे कायदेविषयक शिबिरामध्ये मोलाचे मार्गदर्शन करण्यात आले आहे . कायदेविषयक तथा विधी साक्षरता विद्यार्थी विद्यार्थिनी मोठे फायदा होईल. विधी सेवा समिती तथा वकील संघ अंबड यांच्या संयुक्त विद्यामानाने अध्यक्ष तालुका विधी सेवा समिती अंबड तथा जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री न्या.एस.बी.गायधनी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली न्यायाधीश श्रीमती जैन मॅडम, दिवाणी व फौजदारी न्यायालय अंबड,पो नि सतीष जाधव सर पो स्टे अंबड,पोउपनि पूजा कदम मॅडम भरोसा सेल जालना तथा दामिनी पथक प्रमुख जालना, पो.कॉं.विनायक कोकणे,तालुका विधि सेवा समिती चे कर्मचारी ढोले मॅडम, ड.आशा गाडेकर मॅडम, ड.प्रज्ञा बागुल,विधी स्वयंसेवक नाजीम सय्यद , संजय खोरे , प्रशांत बागुल . मत्स्योदरी महाविद्यालयातील प्राचार्य डॉ.शहाजी गायकवाड उपप्राचार्य ज्ञानेश्वर उबाळे प्रा. पांडुरंग काळे, प्रा. पोपटराव सुरासे,प्रा. विशाल खरात यांच्यासह सर्व स्टाफ व विध्यार्थी - विध्यार्थीनी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. कृष्णा परमेश्वर यांनी तर आभार प्रा. पांडुरंग काळे यांनी मानले.

# जिल्हा प्रशासनाची दिशाभूल , लिंबा गणेश करांच्या आंदोलनाचा ईशारा ?:- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय राज्यमार्ग क्रमांक ५४८ डी महामार्गावरील येळंबघाट येथे ग्रामस्थांच्या मागणीवरून गतिरोधक बसविण्यात आलेले आहेत. मात्र याच मार्गावर लिंबागणेश येथील बसस्थानक आणि भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयासमोर सुरक्षिततेसाठी गतिरोधक बसविण्यास एचसीपीएल कंपनीला काय अडचण आहे असा सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर व हरिओम क्षीरसागर यांनी विचारला आहे.

अहमदपूर ते अहिल्यानगर राष्ट्रीय राज्यमार्ग क्रमांक ५४८ डी मार्गावरील लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात १००० पेक्षा जास्त विद्यार्थी संख्या असुन शाळेचे मुख्य प्रवेशद्वार अगदी महामार्गाला लागुनच असल्याने शाळा भरताना आणि शाळा सुटल्यानंतर गर्दी असते.याठिकाणी यापूर्वी सुद्धा वारंवार अपघाताच्या घटना घडलेल्या असुन या अपघात प्रवण क्षेत्रात गतिरोधक बसविण्याची मागणी गेल्या २ वर्षांपासून पालकांची असुन डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली २-३ वेळा रास्तारोको आंदोलन करण्यात आलेले आहेत.

गेल्यावर्षी दि.४ जानेवारी २०२४ रोजी लिंबागणेश येथील भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयासमोर गतिरोधक बसविण्यात यावेत या मागणीसाठी डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली तब्बल ३ तास रास्तारोको आंदोलन करण्यात आले होते. तत्कालीन तहसीलदार सुहास हजारे यांनी याची दखल घेत दि.२० फेब्रुवारी २०२४ रोजी तहसिल कार्यालयात बैठक बोलावली होती.तेव्हा म.रा.म.वि.(मर्या) छत्रपती संभाजीनगर अभियंता महेश देशमुख,नायब तहसीलदार प्रशांत सुपेकर, एचसीपीएल कंपनीचे कंत्राटदार यांनी राष्ट्रीय



महामार्गावरील गतिरोधक बाबत सडक परीवहन व राजमार्ग मंत्रालय नवी दिल्ली यांच्या दि.२९ आगस्ट २०१६ रोजीच्या पत्रकान्वये महामार्गावरील गतिरोधक बाबत सुचना प्राप्त अनुषंगाने गतिरोधक बसविण्यात येणार नाही असे सांगून प्रशासनाची दिशाभूल केली.मात्र बसस्थानक, शाळा, धोकादायक वळण आदी अपघात प्रवण क्षेत्रात ग्रामस्थांनी मागणी केल्यानंतर बसविण्यात येते. त्याच अनुषंगाने एचपीएम कंपनीने येळंबघाट याठिकाणी गतिरोधक बसविले असुन रात्रीच्या वेळी लांबुन गतिरोधक दिसावेत यासाठी रेडीमेड बसविण्याचे काम सुरू आहे. त्यामुळे लिंबागणेश याठिकाणी गतिरोधक बसविण्याची मागणी डॉ.गणेश ढवळे व हरिओम क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी बीड यांना केली आहे.

जिल्हा प्रशासनाची दिशाभूल करणा-या एचपीसीएल कंपनीकडून जिल्हा प्रशासनाची दिशाभूल करण्यात येत असुन तातडीने लिंबागणेश येथील बसस्थानक, भालचंद्र माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय आदी अपघात प्रवण क्षेत्रात गतिरोधक न बसवल्यास पुन्हा आंदोलनाचा ईशारा ग्रामस्थांनी लेखी निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी बीड यांना दिला आहे.

# पोलिसांनी काळया फिल्म लावलेल्या गाड्यांवर कठोर कारवाई करावी- एसपींनी आदेश द्यावेत

## -ॲड. अजित देशमुख

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात गुंडगिरी फोफावत आहे. या गुंडगिरीतून अनेक गुन्हे घडत आहेत.पोलिसांनी काळया फिल्म लावलेल्या काचा असलेल्या गाड्यांवर कठोर कारवाई करावी. गुंडगिरीतून अनेक गुन्हे घडत आहेत आणि अनेकांचे बळी जात आहेत. त्यामुळे एस. पी. नवनीत कावत यांनी याबाबत त्वरित आदेश द्यावेत. गुन्हेगारीवर रोख आणावी, असे आवाहन जेष्ठ समाज सेवक मा. अण्णा हजारे प्रणित भ्रष्टाचार विरोधी जन आंदोलनाचे विश्वस्त ड. अजित एम. देशमुख यांनी केले आहे.

जिल्ह्यातील गुन्हेगार पोलिसांना माहीत आहेत. याच सलोख्याने वाळू माफिया, गुटखा माफिया, खंडणीखोर, बोगसगिरी करणारे जन्म घेत आहेत. हे सर्व गुन्हेगार काळया काचाच्या गाडीतून फिरतात. डिजिटल नंबर प्लेट गाड्यांना लावतात. त्यामुळे पोलिसांनी बेकायदेशीर रीतीने चालणाऱ्या या गाड्यांवर कठोर कारवाई करावी.वाहनांवर कारवाई करत असताना ड्रायव्हरचे लायसन देखील निलंबित करावे. गुन्हेगारांमार्फत दहशतीचे वातावरण पसरवले जात असून याला अनेक जण कारणीभूत आहेत. यातून बीड जिल्ह्यात व्यवसाय निमित्त कोणीही येण्यास तयार नाही.

जिल्ह्याची मोठ्या प्रमाणात बदनामी होत असून हे कुठेतरी रोखणे गरजेचे आहे. वेगवेगळ्या पद्धतीने पाऊले उचलून जिल्ह्याची बदनामी थांबवण्यासाठी प्रत्येक सुज्ञ नागरिकांने पुढे येणे आवश्यक आहे.मस्साजोग येथे आज भेट दिल्यानंतर जी परिस्थिति तिथे दिसली, त्यावरून विदारक चित्र निर्माण होत असल्याचे दिसत आहे. त्याचबरोबर वाळू माफिया, गुटखा माफिया खंडणीखोर, बोगसगिरी करणारे जन्म घेत आहेत. प्रशासनातील अनेक लोक हप्तेखोरी मुळे या लोकांबरोबर जोडले गेले आहेत. समाजासाठी ही बाब विघातक आहे.

हे सर्व रोखण्यासाठी आज समाजातील दक्ष नागरिकांनी पुढे येणे आवश्यक आहे. बीड जिल्हा बिहार झाल्याचे चित्र महाराष्ट्रात निर्माण झाले आहे. येथील गुंडगिरी देखील त्याचप्रमाणे आहे. नवीन एसपी काय करतात, याकडे देखील जनतेचे लक्ष लागले आहे, असेही ड. देशमुख यांनी म्हटले आहे.



अमरावती ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे विदर्भ प्रमुख निलेश सोमाणी यांच्या मातोश्री स्नेहलता सोमाणी यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे यांनी शनिवारी सोमाणी सदन, उजांबावाडी अंबापेठ, राजकमल चौक येथील निवासस्थानी भेट देऊन सोमाणी परिवाराचे सात्वन केले. यावेळी निलेश सोमाणी, राजेश सोमाणी, श्याम सोमाणी, वडील पूनमचद सोमाणी,मोठे वडील प्रेमचंद सोमाणी, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पश्चिम विदर्भाध्यक्ष नयन मोंढे, जिल्हाध्यक्ष प्रवीण शेगोकार माजी जिल्हाध्यक्ष विजय गायकवाड शुभम मेश्राम जीरापुरे यांच्यासह महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते

हे पत्रक, मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक श्री वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटर्स ॲण्ड पब्लिशर्स, मोंढा रोड,बीड जि.बीड -४३११२२ येथे छापून साप्ताहिक शिववाणी बीड कार्यालय : घर नं.१०२, छत्रपती कॉलनी, क्रांती नगर, तहसीलच्या मागे, बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिध्द केले. (सर्व वाद बीड न्यायकक्षेत). का.संपादक : शेख आयेशा

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT INDRADHANUSHYA PRINTERS & PUBLISHERS, MONDHA ROAD, BEED, DIST.BEED-431122 AND PUBLISHED AT H.No.102, CHATRAPATI COLONY, KRANTI NAGAR, TAHASIL BACKSIDE, BEED-431122(MAHARASHTRA) (JURISDICTION AT BEED)



जि.प.प्रा.शाळा बदापुर येथे शा.व्य.समीतीची निवड बिनविरोध शिस्तप्रिय, विद्यार्थी प्रिय,मुख्याध्यापक ज्ञानेश्वर बचाटे सर यांनी केले सर्वांचे स्वागत

जि.प.प्रा.शाळा बदापुर येथील शाळा व्यवस्थापन समितीची निवड बिनविरोध करण्यात आली असुन अध्यक्षपदी श्रीकृष्ण एखंडे व उपाध्यक्ष पदी दादाराव एखंडे यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी सन्माननीय सदस्य अभय एखंडे,रामा एखंडे, राजेंद्र मगरे,अंजना मगरे,रमेश मिरासे, परमेश्वर एखंडे, सतीश एखंडे,शिल्पा कुलकर्णी मॅडम मेघराज पवार सर उपस्थित होते. मुख्याध्यापक ज्ञानेश्वर बचाटेसर, यांनी उपस्थित सर्व सदस्यांचे शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन सर्वांचे स्वागत केले. यावेळी गावकरी उपस्थित होते.

# रथसप्तमीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा हस्तपोखरी येथे सूर्यनमस्कार स्पर्धेची तयारी

अंबड ।प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा येथे योग शिक्षक गजानन पांडुरंग पुरी सर, यांनी शाळेचे मुख्याध्यापक श्री. सुभाषराव हर्षे सर, समुदाय अधिकारी डॉ अरूण घुले साहेब नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणारे विद्यार्थीप्रिय उपक्रमशील शिक्षक दत्तात्रय शिंदे सर, दत्ताजी घायाळ सर सुवर्णा घुगे मॅडम, आदींच्या प्रमुख उपस्थितीत रथसप्तमी निमित्त अंबड येथे होणाऱ्या राज्यस्तरीय सूर्य नमस्कार स्पर्धेच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांची सूर्य नमस्कार स्पर्धेची जोरदार तयारी सुरू करण्यात आली


असुन योग शिक्षक गजानन पांडुरंग पुरी सर, मुख्याध्यापक सुभाषराव हर्षे सर,नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणारे उपक्रमशील शिक्षक दत्तात्रय शिंदे सर, दत्ताजी घायाळ सर, सुवर्णा घुगे मॅडम हे विद्यार्थ्याना सूर्य नमस्कार, त्याचे

बारा प्रकार मंत्रोच्चारात त्याची,व्याख्या, कृती, लाभ, दक्षता, घ्यावयाची काळजी, कोणत्या आसनात श्वास पूरक, कुंभक, रेचक असतो, सूर्य नमस्कार स्पर्धेचे नियम अटी या विषयी सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आली. यावेळी शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सन्माननीय सदस्य, सरपंच, उपसरपंच, आशाताई, अंगणवाडी सेविका, मदतनीस, गावातील जेष्ठ नागरिक, पत्रकार आदी गावकरी मोठया संख्येने उपस्थित होते




## मुप्टा संघटनेचे बीड येथे महत्त्वपूर्ण बैठकीचे आयोजन :

मुप्टा शिक्षक संघटनेचे संस्थापक सचिव प्रा. सुनील (भाऊ ) मगरे सर यांच्या अध्यक्षतेखाली मुप्टा शिक्षक संघटनेची बैठक बीड येथे आयोजित करण्यात आली आहे .या बैठकीमध्ये विविध विषयावर महत्त्वपूर्ण चर्चा करण्यात येणार आहे यामध्ये प्रामुख्याने सर्व जिल्हा निहाय आढावा, संघटनेची व्याप्ती व धोरण , संघटनेचे अधिवेशन बाबत, पुढील आंदोलनाची दिशा, सदस्य नोंदणी अभियान , व संघटनेतील संघटनात्मक बदल यासारख्या महत्त्वाच्या विषयावर चर्चा करण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे . तरी सर्व जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी दिनांक २९ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी १२ वाजता बीड येथे उपस्थित रहावे . असे आवाहन बीड जिल्हाध्यक्ष शरद मगर , जिल्हाध्यक्ष (जूनियर चे ) प्रा. शशिकांत जावळे , माध्यमिकचे जिल्हाध्यक्ष प्रवीण तरकसे , जिल्हा सचिव नारायण घोलप, जिल्हा सचिव श्रीकांत वारभुवण ,शैलेश चिलवंत , जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. संजय बागुल , प्रमोद साळवे, अमित वाघमारे , राउत सर आदींनी केले आहे.



# स्व.संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी सर्व पक्ष, समाज आणि संघटना एकत्र येणार

## आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी उद्या सामूहिक बैठक

बीड ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची अमानवीय पध्दतीने निघृण हत्या केल्याच्या प्रकरणात न्याय मिळविण्यासाठी सर्व पक्ष, समाज व संघटना आणि एकत्र येऊन आंदोलन करणार आहेत. या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी सोमवारी (दि.२३) रोजी बीड शहरातील आशिर्वाद लॉन्स येथे सकाळी १० वा. सामूहिक बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.


मस्साजोग येथील सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. अतिशय निघृणपणे स्व.देशमुख यांची हत्या करण्यात आली आहे. संपूर्ण जिल्ह्यात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तब्बल १४ दिवस उलटूनही स्व.देशमुख यांचे मारेकरी आणि या प्रकरणाचा सुत्रधार अद्याप मोकाट आहेत. इतके गंभीर प्रकरण असताना प्रशासनाकडून आरोपींच्या अटकेत चालढकल केली जाते आहे. आरोपी हे सत्तेच्या राजाश्रयात असल्याने त्यांना अटक केली जात नाही. सत्तेचा इतका दुरूपयोग जनसामान्यांना घातक ठरत चालला आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय आणि सर्व विचारांचे लोक एकत्र येऊन सर्वसमावेशक आंदोलन उभे करणार आहेत. दरम्यान या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित केलेल्या सामूहिक बैठकीला सर्व पक्ष, संघटना आणि सर्वच विचारांच्या लोकांनी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

# फळपीक विमा धारक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी

### आमदार नारायण कुंचे यांनी औचित्याच्या मुद्दा द्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे केली मागणी

बदनापूर ।प्रतिनिधी

नागपूर येथील विधीमंडळ अधिवेशनादरम्यान औचित्याचा मुद्दा उपस्थित करत आमदार नारायण कुंचे विधानसभेत म्हणाले की, जालना जिल्ह्यातील फळबाग शेतकऱ्यांनी एचडीएफसी ॲग्रो या विमा कंपनी कडे सन२०२३-२०२४ मधील आंबिया बहार मोसमातील हवामान आधारित फळ पीक विमा योजना भरला होता.यामध्ये डाळिंब, मोसंबी, द्राक्ष, इत्यादी फळपिकांचा समावेश होता, आंबिया बहाराच्या मोसमात अतिवृष्टी झाली.बदलत्या हवामानामुळे व सततच्या पावसाने शेतकऱ्यांच्या फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.जिल्हातील शेतकऱ्यांनी नियमानुसार फळपिकांचा विमा काढल्याने सर्व शेतकरी विम्याची रक्कम मिळण्यासाठी पात्र ठरले आहेत.तरी संबंधित कंपनीला फळबाग शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कडे आमदार नारायण कुंचे यांनी विधिमंडळात केली.



## घनसावंगी मतदारसंघाचे नवनिर्वाचित आमदार डॉ.हिकमत दादा उढाण यांचा थेरगाव येथे जंगी सत्कार

जालना ।प्रतिनिधी

थेरगाव येथे घनसावंगी विधानसभा मतदार संघाचे नवनिर्वाचित आमदार डॉ.हिकमत दादा उढाण यांची आमदार पदी निवड झाल्याबद्दल थेरगाव ग्रामस्थांच्या वतीने जंगी सत्कार करण्यात आला आहे.यावेळी त्यांच्यासोबत असलेले रविभाऊ भुतेकर, वडीवाडीचे राठोड, देशमुख सर्व प्रमुख पाहुण्यांचे देखील हार शाल श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले यावेळी थेरगाव येथील शिवसेना शाखाप्रमुख बबनराव अनपट, वाल्मीक बबन अनपट (भाजपा) पोलीस पाटील नारायण आटोळे, उपसरपंच यांचे पती गणेश देविदास अनपट,माजी सरपंच रामकिसन आटोळे, विष्णू भाऊ मस्के, अकुशराव आटोळे,केरुबा मारोती आटोळे,समविचार असलेले सोपानजी गायकवाड, नारायणराव मावसकर, दत्ता अनपट, नितीन आटोळे, शिवसेना कार्यकर्ते मनोज अनपट, अनिल भुतेकर, किशोर अनपट,बद्री शिंदे, सुरेश अनपट, लक्ष्मण आटोळे, ज्ञानेश्वर कातकडे, ग्रामपंचायत शिपाई अनिरुध्द अनपट सर्व ग्रामस्थ व तमाम कार्यकर्त्यांनी जंगी स्वागत केले.यावेळी महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या




# ठाकुर रामकृष्ण परमहंस परिवाराच्या वतीने वृंदावन धाम केज येथे शारदामाता जयंती उत्साहाने साजरी

केज/प्रतिनिधी

केज शहरातील ठाकुर रामकृष्ण परमहंस परिवाराच्यावतीने वृंदावन धाम येथे शारदामाता जयंती उत्साहपुर्ण वातावरणात दिनांक २२ जानेवारी २०२४ रविवार रोजी संपन्न झाली. रविवारी सकाळी ९-३० वाजता शारदामाता यांच्या प्रतिमेचे पुजन पुष्पहार अर्पण करुन करण्यात आले त्यानंतर सकाळी १०-३० वाजता सामुहीक ध्यान संपन्न झाले.त्यानंतर सकाळी ११-०० ते १२-३० या वेळेत सत्संग व अनुभव कथन करण्यात आले. ठाकुर रामकृष्ण परमहंस परिवाराच्या गुरुमाता श्रीमती सुमनबाई खंदारे यांचा वाढदिवस साधक परिवाराने साजरा केला. केज तालुक्यातील वरपगाव येथील सत्पुरुष आचार्य विनोबा भावे यांचे परमशिष्य स्व.वासुदेवराव खंदारे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली ठाकुर रामकृष्ण परमहंस परिवाराची केज शहरा मध्ये स्थापना करण्यात आली होती.आता या परिवाराचे वटवृक्षात रुपांतर झाले असुनसंपुर्ण देशात परिवार पसरला असुन विवीध क्षेत्रात परिवाराचे साधक आपला वेगळा ठसा उमटवत आहेत.ठाकुर रामकृष्ण परिवाराचा शारदामाता जयंती,स्वामी विवेकानंद जयंती,ठाकुर रामकृष्ण परमहंस स्मृती सोहळा, ठाकुर रामकृष्ण परमहंस जयंती असे कार्यक्रम घेतले जातात तसेच वर्ष भर सामाजिक उपक्रम ही राबवले जातात यामध्ये चातुर्मासा मध्ये सर्व समाजातील गोरगरीब लोकांना दररोज अन्नदान केले जाते तसेच गोर गरीबांची दिवाळी निमीत्त गरीब कुटुंबातील महीलां ना साड्या वाटपाचा कार्यक्रम,फराळ वाटप, शालेय विद्यार्थ्यांना गणवेश तसेच शालेय साहित्याचे वाटप असे कार्यक्रम होत असतात. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्रातुन सर्व साधक आपला सहभाग नोंदवितात त्यामुळे हे सर्व कार्यक्रम भव्य दिव्य स्वरुपाचे असतात. रामकृष्ण परिवाराचा अध्यात्मीक व सांस्कृतिक वारसा परिवाराचे आधारवड स्व.वासुदेवराव खंदारे गुरुजी,गुरुमाता श्रीमती सुमनबाई खंदारे यांच्या आशिर्वादाने कार्यक्रम संपन्न होतात. महाप्रसादानंतर रामकृष्ण परमहंस परिवाराचा शारदामाता जयंतीचा कार्यक्रम मातृ शक्तींच्या सहकार्याने उत्साहात संपन्न झाला.यावेळी ठाकुर रामकृष्ण परमहंस परिवाराचे साधक विवीध कथाकार भावरत्न ह.भ.प.समाधान महाराज शर्मा यांनी परिवाराच्या वतीने दिनांक ९ फेब्रुवारी २०२५ ते १६ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत संपन्न होत असलेल्या रामकृष्ण परमहंस स्मृती सोहळ्याला उपस्थिती द्यावी असे आवाहन केले आहे.



# राज्यात वाळू माफियांना पायबंद घालू महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा

## अभ्यास करुन वाळूविषयक सुलभ धोरण महसूल विभाग 'जनता सर्वोपरी' ठरवू झुडपी जंगल जमिनींचा प्रश्न मार्गी लावणार

नागपुर ।प्रतिनिधी

जनतेला त्रासदायक ठरलेल्या महाराष्ट्रातील वाळू माफियागिरीला पायबंद घालण्यासाठी सरकार विशेष लक्ष देईल. वाळू विषयक सुलभ धोरण आणू, अशी घोषणा राज्याचे महसूल मंत्री चन्द्रशेखर बावनकुळे यांनी केली. ते म्हणाले, जनतेला वाळू सहज उपलब्ध होईल असे सुलभ धोरण देशातील कोणत्या राज्यात आहे, त्यासंदर्भात अभ्यास करून महाराष्ट्रात वाळूविषयक सुलभ धोरण अस्तित्वात आणू महसूल मंत्री चन्द्रशेखर बावनकुळे थांनी रविवारी माध्यमांशी संवाद माचला महसूल विभागामुळे जनतेला त्रास होतो आहे, हे मी बघु, शकणार नाही, 'जनता सर्वोपरी असे आपले कामजाजाचे धोरण राहणार असून देशातील सर्वात यांगला महसूल विभाग महाराष्ट्राचा असेल अशी ओळख मी निर्माण करेन, असा निर्धार बावनकुळे यांनी व्यरू केला झुडपी जंगल जमिनींचा मार्गी लावणार ते मामाले, राज्यात सुमारे ८६ हजार हेक्टर झुडपी जंगल जमिनींचा प्रश्न प्रलंबित असून, यामुळे अनेक विकास प्रकल्प रखडले आहेत. या

जमिनी प्रामुख्याने विदर्भात अधिक असून, यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात खटला चालू आहे. याखटल्याच्या बाबतीत न्यायालयात पाठपुरावा करून, हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करू जनतेचे हेलपाटे कमी करू शेतकरी शेतमजूरांशी संबंधित असणाऱ्या या खात्यात अनेक कायद्यांमध्ये सुधारण्णा करणे आवश्यक आहे. त्याचा अभ्यास करून राज्याच्या विकासाची गती वाढविण्यात येईल, असे सांगून बावनकुळे म्हणाले, की कागदपत्रांशी निगडित नागरिकांची महसूल खात्याशी संबंधित अनेक कामे असतात, नागरिकांना या कामांसाठी तलाठी कार्यालय ते जिल्हाधिकारी कार्यालय आणि जिल्हाधिकारी कार्यालय ते शासनस्तरापर्यंत कमीत कमी हेलपाटे मारून काम कसे करता येईल, वासंबंधी लवकरच उपाययोजना आयु आणि सर्वसामान्य जनतेला दिलासा देवू मुद्रांक शुल्क, जमाबंदी आयुक्त तसेच वाळूशी संबंधित धोरणांमध्ये सुलभीकरण करण्याचा तसेच वाळूमाफियांना पूर्णपणे पापबंद

घालण्याचा माझा प्रयत्न आहे, असे सांगून बावनकुळे म्हणाले, धोरण प्रक्रियेत सुलभीकरण आणण्यासाठी इतर राज्यांतील उपयुक्त कायद्यांचाही अभ्यास करणार असून येत्या काळात महसूल विभागात सकारात्मक पाहायल्प बदल आपल्याला मिळतील. सरकारमध्ये गोग्य समन्वय बहु पक्षीय सरकार समजुतीने चालवावे लागते. त्यासाठी समन्वय आवश्यक असतो. महायुतीतील तिन्ही पक्षांमध्ये समन्यप असून खातेवाटपामध्येही तो दिसून आला आहे. तसेच, पालकमंत्रिपदांचे वाटप करतानाही कोणतीही कुरबूर न होता आमचे नेते, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार याच्याबरोबर योग्य समन्वय साधून पालकमंत्रिपदांचे वाटप करतील, असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त कैला छगन भुजबळ हे महायुतीतील महत्त्वाचे नेते असून, त्यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातील नेते अजित पवार, प्रफुल्ल पटेल आणि सुनील तटकरे हे त्यांच्या बाबतीत योग्य निर्णय घेतील, असेही म्हणाले बावनकुळे यांनी भुजबळ

यांच्याबाबत विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. राहुल गांधी यांचा दौरा म्हणजे नौटंकी राहुल गांधी यांचा परभणी येथील दौरा हा नौटंकी आहे. परभणी येथे घडलेली घटना निश्चितच दुर्दैवी असून, घटनेतील आरोपी मनोरुग्ण आहे. आरोपीला पोलिसांनी तत्काळ अटक केली असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात या संदर्भात स्पष्टीकरण दिले आहे. तरीसुद्धा केवळ राजकारण करण्यासाठी राहुल गांधी है परभणीचा दौरा करत आहेत परंतु मागासवर्गीय, ओबीसी असे सर्व समाज राज्यात एकत्र गुण्यागोविंदाने नांदत असून, कोणताही समाज त्यांच्या या राजकारणाला बळी पडणार नाही. कॉंग्रेसने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना निवडणुकीत पराभूत केले. डॉ. आंबेडकर हे संसदेच्या कोणत्याही सभागृहात येऊ शकणार नाहीत, पासाठी राजकारण केले. त्यामुळे जनतेलाही कॉंग्रेस आणि राहुल गांधी यांची नौटंकी कळत असल्याचे चन्द्रशेखर बावनकुळे





केज/प्रतिनिधी

अलिबाग येथे शेकापच्या महिला आघाडीच्या राज्य प्रमुख तथा अलिबागच्या उपनगराध्यक्षा ड. मानसी म्हात्रे यांच्या निवासस्थानी भाई मोहन गुंड यांनी भेट दिली असता यावेळी त्यांचे स्वागत करताना यावेळी अभिजितजाधव,भिमराव कुंटेअमर घोगाडे,ज्ञानेश्वर घाडगे,रोहीत जागताप व इतर सहकारी उपस्थित होते.परवा अलिबाग येथे पीएनपी स्कूलच्या माध्यमातून प्रभाविष्कार सांस्कृतिक कार्यक्रमास चिऊताई पाटील,भाई मोहन गुंड,स्टार गायक अभिजित कोळंबे,विक्रांत वराडे व इतर मान्यवर यावेळी उपस्थित होते.



अर्जुन खोतकर यांचा सत्कार घनसावंगी : जालना विधानसभा मतदारसंघाचे आमदार म्हणून अर्जुन राव खोतकर हे निवडून आल्याबद्दल त्यांचा घनसावंगी पंचायत समितीचे माजी सभापती मधुकर साळवे, राजेंद्र साबळे यांनी सत्कार केला.

# गेवराई शहरातील महा आरोग्य शिबीरात उत्स्फूर्त प्रतिसाद

**हृदयविकाराकडे दूर्लक्ष करु नका, काळजी घ्या – डॉ. सुनिल बोबडे यांचे हृदय रोगावर अमूल्य मार्गदर्शन**
**स्वत:च्या आरोग्यासाठी वेळ द्या – माजी आमदार लक्ष्मण पवार**



गेवराई ।प्रतिनिधी

वार्ताहर : रोजच्या धावपळीत आयुष्याकडे दूर्लक्ष झाल आहे. त्यामुळे, आजाराचा आलेख उंचावत चालला आहे. काळजी करण्याची गरज असून, नागरीकांनी निरोगी आरोग्यासाठी स्वत:ची काळजी घेतलीच पाहिजे. हृदय विकाराच्या वाढत्या घटना काळजीत टाकणाऱ्या असून, वेळीच लक्ष देण्याची गरज असल्याचे प्रतिपादन हृदय रोग तज्ज्ञ डॉ. सुनिल बोबडे यांनी येथे बोलताना केले आहे. शनिवार ता. २१ डिसेंबर रोजी युवा नेते बाळराजे पवार यांच्या वाढदिवसानिमित्त गेवराई शहरातील नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजीमहाराज शॉपिंग सेंटर सभागृहात महा आरोग्य शिबीराचे आयोजित करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर माजी आमदार लक्ष्मण पवार, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.सुरज कोठावळे, डॉक्टर राजेश शिंदे, डॉक्टर सराफ, शिवराज पवार, नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, डॉ.धनजय माने, डॉ.दिपक फाटक,डॉ.आनंद मोटे,डॉ. विशाल पवार, डॉ.प्रशांत गायकवाड यांची उपस्थिती होती. दरम्यान, दैनंदिन जीवनात भाजीपाला आणि हलक्या आहाराचा उपयोग करून, तळलेले, तेलकट आणि मेदयुक्त पदार्थ टाळायचा प्रयत्न करा, असे आवाहन ही त्यांनी यावेळी केले आहे. दरम्यान, वय वाढल्यावर आपल्या आरोग्याची काळजी नागरिकांनी घ्यायलाच हवी. व्याधी सुरू झाल्यानंतर, पश्चाताप करण्यात काय अर्थ आहे. अपरिहार्यता म्हणून, आपल्याला रासायनिक युक्त अन्नधान्य खावे लागते. त्यामुळे, प्रत्येक नागरिकांनी स्वत:साठी एक दोन गुंठे किंवा परसबागेत पालेभाज्या लावून, आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन माजी आमदार लक्ष्मण पवार यांनी केले. पवार यांनी स्व- अनुभव विशद करून, हृदय विकाराचा त्रास होऊ नये, या संदर्भात काय काळजी घ्यावी, या विषयी महत्त्वपूर्ण गोष्टी सांगून, आरोग्यमय धनसंपदा असल्याचा उल्लेख केला. ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुतार यांनी ही हृदय विकाराचा सामना कसा केला. या विषयी मार्गदर्शन करून, स्व अनुभव विशद केला. यावेळी डॉ. सुनिल बोबडे यांनी हृदयविकाराची लक्षणे आणि उपाय या विषयी सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले, टॅक म्हणजे, हृदयावर हामला. रक्त पुरवठा कमी झाला की, टॅक येण्याचा धोका वाढतो. ताणतणाव, चिडचिड होणे, अती राग ,अवेळी खानपान, तेलकट, मेदयुक्त पदार्थाचे सेवन, उशिरा झोप इ. कारणाने हृदय विकाराचा संभव असतो. अलीकडच्या काळात ६३% लोकांना हृदय रोगाचा त्रास सहन करावा लागतो. मात्र, केवळ ५३% लोक तत्परता दाखवत नाहीत, ही गंभीर बाब असून, सरकारी, खाजगी रुग्णालयात उपचार घेऊन, रूग्ण बरा होतो. याकडे त्यांनी लक्ष वेधले.हृदय विकारात प्रचंड वेदना होतात. ९०% छातीत दुखते,१०% लोकांना पाठित, डाव्या हातात त्रास जाणवतो. मात्र, आपल्याला जळजळ झाल्याने त्रास होत असेल, या दृष्टिकोनातून त्याकडे दुर्लक्ष केले जाते. हे अतिशय चुकीचे असल्याचे त्यांनी सांगितले. हृदय रोग, मधुमेह टाळता येतो. अनुवंशिक आजाराचा इतिहास असेल तर, किमान असे आजार कंट्रोल ठेवता येतात, असे निरिक्षण डॉ. बोबडे यांनी नोंदवून, अचानक त्रास जाणवला की, घाबरू नका ; कुणाची तरी मदत घ्या. शांत पडून रहा, चालू नका, गडबड करू नका, असा मौलिक सल्ला ही त्यांनी दिला. वेळेत वैद्यकीय तपासण्या करा, आपल्याकडे सुविधा उपलब्ध आहेत. त्याचा फायदा घ्या, असे आवाहन करून, बीड शहरात आपल्या हक्काचा मेडिकेअर नावाचा दवाखाना रुग्ण सेवेसाठी सदैव तत्पर असणार आहे. गेल्या दीड - दोन वर्षांपासून बांधिलकी जोपासून आम्ही करत आहोत. शासन स्तरावर असलेली सुविधा उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे, गेवराईकरांनी हक्काने यावे, असे कृतज्ञतापूर्वक आवाहन डॉक्टर बोबडे यांनी शेवटी बोलताना केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नगरसेवक संजय इंगळे यांनी केले. आभार ड. भगवान घुंबार्डे यांनी मानले.बाळराजे पवार मित्र मंडळाच्या वतीने पार पडलेल्या महा शिबीरात मधुमेह , रक्तदाब, हृदयरोग, ई.सि.जी. करण्यात आली. या शिबीरात नागरिकांनी रक्तदान करून सहभाग नोंदवून शिबीराचा लाभ घेतला.




# गृहमंत्री अमित शहाच्या वक्तव्याचा वडवणीत निषेध व्यक्त करत तहसीलसमोर तीव्र निदर्शने

**पायी रॅली काढून घोषणाबाजी करत केला निषेध व्यक्त**

वडवणी ।प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विरोधात देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत अवमान जनक शब्द उच्चारुन भिमसैनिकांच्या भावना दुखवल्या असल्याने वडवणीत निषेध व्यक्त करण्यात आला आहे. यावेळी निषेध पायी रॅली काढून निषेध व्यक्त करत प्रचंड घोषणाबाजी करत तिव्र निदर्शने करण्यात आले आहेत. यावेळी तहसीलदारांना निवेदन देण्यात आले आहे.

परभणी येथील घटना ताजी असतानाच देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेमध्ये संविधानाचे ७५ वे वर्षे साजरे करत असताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बद्दल अवमान जनक शब्द उच्चारुन अवमान केला असल्याने आंबेडकरी जनतेमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात असून या वक्तव्याने सर्व भारतीयांचे व आंबेडकरी जनतेच्या भावना दुखवल्या आहेत याप्रकरणी गृहमंत्री अमित शहा यांनी देशातील सर्व मीडिया समोर आंबेडकरी जनतेची जाहिर माफी मागावी आणि त्यांनी स्वता गृहमंत्री पदाचा राजीनामा द्यावा या प्रमुख मागणीसाठी वडवणी तहसील कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करण्यात आली आहेत. या निदर्शनाची सुरुवात शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते, स्व.वसंतराव नाईक चौक, संविधान चौक, जिवाजी महाले चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, छत्रपती संभाजी महाराज चौक मार्गे वडवणी तहसीलवर पायी निषेध रॅली काढण्यात आली आहे. प्रत्येकाच्या हातामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा घेऊन या रॅलीमध्ये युवक सहभागी झाले होते. यावेळी जय भीम...जय भीम चा नारा देत प्रचंड घोषणाबाजी करत तहसील कार्यालयासमोर तीव्र निदर्शने करत गृहमंत्री अमित शहा यांनी माफी मागावी अशी मागणी करत तहसीलदारांना निवेदन देण्यात आले यावेळी भिमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी वडवणी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# आत्मतत्त्वाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे शिवपुराण – स्वामी हरिहरानंद भारती

धारूर / प्रतिनिधी

आत्मतत्त्वाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजेच शिवपुराण होय. असे प्रतिपादन स्वामी हरिहरानंद भारती यांनी किल्लेधारूर येथील समस्त उदयनगर महिला मंडळ आयोजित शिवकथेत मांडले. स्वामी हरिहरानंद भारती हे पुर्वाश्रमापासुन अनेक पुराण कथा करतात आतापर्यंत त्यांच्या १५०० च्या वर शिवकथा झाल्या आहेत. ते या शिवकथेच्या द्वितीय दिनाच्या सत्रात बोलताना ते सांगत होते की, हे विश्व पंचमहाभूतांचे आहे. सत्व रज तमाने युक्त अष्टधाप्रकृती निर्माण झाली व ती ब्रम्हस्वरूपात विलसली. प्रत्येक प्राणीमात्रांचे शरीर हे ह्या अष्टधाप्रकृतीने बनलेले आहे. त्याच अष्टधाप्रकृतीचा विस्तार केला तर अनेक तत्वे निर्माण झालेली दिसतील. ही झाला जडवस्तु जी डोळ्यानां दिसते तिचा अभ्यास व जे अनंत ब्रम्हांडी, जो परमात्मा जो अनेक वर्षे तपश्चर्या करूनही समजत नाही, जो अदृष्य आहे पण त्याच्याच सत्तेने हे जग चालते; तो ब्रह्मांडनायक परमात्मा भगवान शिव, जो चराचरात भरला आहे; जो प्रत्येक प्राणीमात्रांच्या हृदयात विराजमान आहे; त्याचा अभ्यास म्हणजेच शिवपुराण होय.

शम करोती इति शंकरः प्रत्येक जीवाचे कल्याणाचा मार्ग शिव आहे. प्रत्येकाला ओळखण आणि मानवता जपणं हेच या पुराणातून शिकायला मिळत. जीवा जीवात भेद न करता त्यातील शिवाचा शोध करून बोध करून घेणे हाच कथा ऐकण्याचे फळ आहे.शिवापर्यंत जाण्यासाठी अथवा शिव कळण्यासाठी काही विशिष्ट सराव किंवा साधना नाही तर आपल्या अस्तित्वाचा निश्चित असा मार्ग शिवकथा आहे. त्यासाठी शिवपुराणात सांगितलेले अध्यात्म समजून घेतले पाहिजे. विविध कथेच्या माध्यामातून



जे सिध्दांत सांगितले आहेत ते कळाले पाहिजेत फक्त कथा ऐकून वरवर अर्थ काढला तर मनुष्य शिवापर्यंत न जाता वरील कर्मकांडांत अडकून बसेल.

शिवपुराण म्हणजे काही विशिष्ट तोडगे उपाय नसून, गप्पा गोष्टी विशिष्ट कथा नसून किंवा साधना नव्हे तर तो आपल्या अस्तित्वाचा एक निश्चित असा मार्ग आहे. तेथपर्यंत पोहोचण्यासाठी जो मार्ग स्वतः शिवाने पार्वतीस प्रतिपादला तो शिवयोग म्हणजेच शिवकथा. बाह्य उपासने मध्ये गुंतून काही काळा सुख प्राप्त करण्यापेक्षा निरंतर आत्मबोध करून कायम सुखात राहणे हाच शिवकथेचा उपदेश आहे.

कथा श्रवणाने तुमचे शरीर, मन, भावना आणि ऊर्जा यांना एका विशिष्ट पातळीपर्यन्त परिपक्व होते आणि तुमच्यामध्ये काहीतरी अदभूत असे फुलून येते हेच अध्यात्म आहे. जेंव्हा तुमचा तर्क अपरिपक्व असतो, तेंव्हा तुम्ही प्रत्येक गोष्टीवर शंका घेता. जेंव्हा तुमचा तर्क परिपक्व होतो, तेंव्हा तुम्ही सर्वकाही संपूर्णपणे वेगळ्याच दृष्टीकोणातून पाहायला सुरुवात करता.

चंचूला म्हणजे उद्विग्न झालेले मन आणि अस्थिर बुध्दि म्हणजे बिंदुग. हे दोघे विविध वासनेत सतत काहीतरी कार्य करत राहतात त्यांना या वासनाशिल विलासी मार्गातून काढून आत्मबोध जीवन कल्याणाकरीता लावले पाहिजे तेव्हा ते मुक्त होऊन शिवरुपी परमात्म तत्वाशी एक रुप होतील. स्वामींजी अश्या अनेक कथेच्या माध्यमातून श्रोत्यांना मंत्रमुग्ध करत होते. सर्व परिसर शिवमय झाला होता.

यावेळी महिलांची पुरुषांची विशेष गर्दी पाहायला भेटली. या संगीतमय शिवमहापुराणाचे तिसऱ्या वर्षाचे आयोजनासाठी सौ. लक्ष्मी पाथरकर, सौ मिनाक्षी गुंडेवार, सौ. अनिता अनिल डुबे, सौ सुरेखा गुळवे, सौ खंडेलवाल व उदयनगर मधील समस्त महिलांनी विशेष परिश्रम घेतले.

# स्व.संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी सर्व पक्ष, समाज आणि संघटना एकत्र येणार

**आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी उद्या सामूहिक बैठक**

बीड ।प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांची अमानवीय पध्दतीने निघृण हत्या केल्याच्या प्रकरणात न्याय मिळविण्यासाठी सर्व पक्ष, समाज व संघटना आणि एकत्र येऊन आंदोलन करणार आहेत. या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी सोमवारी (दि.२३) रोजी बीड शहरातील आशिर्वाद लॉन्स येथे सकाळी १० वा. सामूहिक बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

मस्साजोग येथील सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणाने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. अतिशय निघृणपणे स्व.देशमुख यांची हत्या करण्यात आली आहे. संपूर्ण जिल्ह्यात दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे. तब्बल १४ दिवस उलटूनही स्व.देशमुख यांचे मारेकरी आणि या प्रकरणाचा सुत्रधार अद्याप मोकाट आहेत. इतके गंभीर प्रकरण असताना प्रशासनाकडून आरोपींच्या अटकेत चालढकल केली जाते आहे. आरोपी हे सत्तेच्या राजाश्रयात असल्याने त्यांना अटक केली जात नाही. सत्तेचा इतका दुरूपयोग जनसामान्यांना घातक ठरत चालला आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील सर्वपक्षीय आणि सर्व विचारांचे लोक एकत्र येऊन सर्वसमावेशक आंदोलन उभे करणार आहेत. दरम्यान या आंदोलनाच्या पूर्वतयारीसाठी आयोजित केलेल्या सामूहिक बैठकीला सर्व पक्ष, संघटना आणि सर्वच विचारांच्या लोकांनी उपस्थित रहावे



बीड – चऱ्हाटा येथील सर्व्हे नंबर १३० अँड. अजय तांदळे यांचे शेतातील पाझर तलावा जवळ बिबट्या दिसला.

# भाऊसाहेब महाराज खेडकर यांना पितृषोक

मानूर ।प्रतिनिधी

शिरूर कासार तालुक्यातील बोरगाव चकला येथील ह भ प भाऊसाहेब महाराज खेडकर यांचे वडील श्री संत वामनभाऊ महाराज संत भगवान बाबा यांचे निष्ठावंत वारकरी वै श्रीपती गणपती खेडकर यांचे वृद्धपकाळाने निधन झाले ते ८५ वर्षे वयाचे होते

अत्यंत साधी राहणे उच्च विचार सतत नामस्मरण व संत वामनभाऊ महाराज व संत भगवान बाबा यांच्या सानिध्यात आपले आयुष्य काढणारे आणि वारकरी संप्रदायाची धुरा चालविणारे श्रीपती खेडकर हे होत त्यांच्या उभे आयुष्यामध्ये त्यांनी नामजपचा १३ कोटी जप केला होता अत्यंत शांत संयमी आणि तेवढेच शिस्तप्रिय असणारे श्रीपती खेडकर यांचे अचानक निधन झाल्याने सर्वत्र हळहळ



व्यक्त करण्यात येत आहे त्यांच्या पश्चामध्ये पत्नी दोन मुले चार मुली सुना नातवंडे असा परिवार आहे महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार ह भ प गणेश महाराज खेडकर यांचे ते वडील होते

# शांताबाई काळे यांचे दु:खद निधन, आज अंत्यविधी

परळी / प्रतिनिधी

परळी शहरातील शांताबाई सदाशिव काळे यांचे नुकतेच आज अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर उद्या दिनांक २३ डिसेंबर रोजी भीम नगर येथील शांतीवन स्मशानभूमीत सकाळी १०, वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्या रेल्वेत कार्यरत असणारे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक संजय काळे यांच्या मातोश्री होत.



शांताबाई काळे यांचे अल्पशा आजाराने दुःखद निधन रविवार दि. २२ रोजी ५ च्या सुमारास झाले. त्यांच्या पार्थिवावर उद्या दिनांक २३ डिसेंबर रोजी सकाळी दहा वाजता भीम नगर येथील शांतीवन स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याचे नातेवाईकांनी सांगितले. २०१३ मध्ये त्यांच्या पतीचे निधन झाले होते. त्यांना ३ मुले ६ मुली, नातवंडे मोठा परिवार आहे.पतीच्या पश्चात मुलांचे संगोपन, शिक्षण, लग्न आदि कार्य मोठ्या हिमतीने शांताबाई यांनी पार पाडले.एएसआय संजय काळे याच्या त्या मातोश्री आहेत. मृत्यू समयी त्या ७७ वर्षाच्या होत्या. वैद्यनाथ प्राथमिक विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक महादू सरवदे यांच्या त्या सासू आहेत. त्यांच्या निधनाने सर्वत्र व्यक्त करण्यात येत आहे.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
Bureau of Indian Standards
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5